जनसंपर्क कक्ष

1 7 MAR 2026 क्रांतिसिंह शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात पोर्ट्रेट, लँडस्केप चित्रकलेविषयी कार्यशाळा

कोल्हापूर (प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे दोनदिवसीय चित्रकला कार्य शाळा उत्साहात पार पडली. कार्यशाळेचा विषय पोर्ट्रेट, लँडस्केप अँड कॉम्पोझिशन असा होता. दळवीज आर्ट्स इन्स्टिट्यूटचे प्रसिद्ध चित्रकार प्रा. अभिजीत कांबळे यांनी विद्यार्थ्यांना चित्रकलेतील बारकावे प्रात्यक्षिकांसह समजावून सांगत मार्गदर्शन केले.

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे सभागृह आणि परिसरात कार्यशाळा झाली. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना पोर्ट्रेट, लँडस्केप तसेच चित्र रचनेतील संतुलन, रंगसंगती आणि मांडणी याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेत विविध प्रकारची चित्रे साकारली.संगीत व नाट्य शास्त्र अधिविभागाच्या भिंतीवर चित्रकला पदविकेच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी साकारलेले भित्तीचित्र पाहून उपस्थित रसिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यासोबत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चित्रांचे चित्रप्रदर्शन देखील आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनात



पोर्ट्रेट, निसर्गचित्रे आणि विविध संकल्पनांवर आधारित चित्रांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या कलाकृतींना उपस्थित कला रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला व त्यांच्या सर्जन शीलतेचे कौतुक करण्यात आले. अधिविभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली बबन माने, विजय उपाध्ये यांनी कार्य शाळेचे समन्वयन केले. कार्य शाळेसाठी प्राचार्य अजेय दळवी, डॉ. मानसिंग टाकळे, चित्रकार विजय टिपुगडे, संग्राम भालकर, सुदर्शन वंडकर, गजानन वाघमारे यांच्यासह अधिविभागातील शिक्षक, चित्रकला शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

17 MAR 2026 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मानवजातीच्या कल्याणाचा विचार करणारे संत तुकाराम : उल्हास पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संत तुकाराम हे मानवजातीच्या कल्याणाचा विचार करणारे महान संत आहेत, असे प्रतिपादन उल्हास पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने आयोजित संत तुकाराम व्याख्यान मालेअंतर्गत 'संत तुकारामांचा मानवतावाद' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित व्याख्यानमालेत बोलताना उल्हास पाटील. समवेत डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

उल्हास पाटील म्हणाले, समाजाचा दडपलेला आवाज उठवणारा संत म्हणून तुकारामांकडे पाहिले जाते. गुलामगिरीविरुद्ध लढण्याची प्रेरणा संत तुकाराम यांच्या मानवतावादातून मिळते. संत तुकारामांचे अभंग माणसाला माणूस बनविण्याचे काम करतात. संत तुकारामांची भक्ती केवळ धार्मिक स्वरूपाची नसून ती सामाजिक, समता, करुणा आणि मानवतेचा व्यापक संदेश देणारी आहे. कुलसचिव डॉ. शिंदे अध्यक्षीय मनोगतात म्हणाले, संत तुकारामांच्या अभंगातील मानवतावादी विचार समजून घेतला पाहिजे आणि संत साहित्याच्या अभ्यासातून प्रेरणा घेऊन समाजातील भेदभाव, अंधश्रद्धा आणि अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमासाठी मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे प्रमुख उपस्थित होते.

सूत्रसंचालन भक्ती नाईक यांनी केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले. यावेळी प्रा. टी. एस. पाटील, प्रा. अवनीश पाटील, प्रा. अक्षय सरवदे, प्रा. शिवकुमार सोनाळकर, प्रा. दशरथ पारेकर, प्रा. मांतेश हिरेमठ, प्रा. प्रकाश दुकळे उपस्थित होते.

17 MAR 2026
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात जनरेशन झेडसंदर्भात कार्यशाळा झाली.

# 'जेनझी'मध्ये मनोबल वाढवण्याची गरज

■ प्रा. साळी यांचे प्रतिपादन

■ शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग येथे "नाविन्यपूर्ण अध्यापनशास्त्र यावर कार्यशाळा झाली. विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अजय साळी यांनी जनरेशन झेडवर मांडणी केली. भावी शिक्षकांना अध्यापन प्रक्रियेत येणाऱ्या आव्हानांची चर्चा केली व शिक्षकाची बदलती भूमिका स्पष्ट करताना त्यांनी जनरेशन झेड (झेन झी) अध्ययनार्थीमध्ये बुद्धीगुणांक, भावनिक बुद्धिमत्तेबरोबरच मानसिक स्थैर्याकडे संक्रमण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी विद्यापीठीय शिक्षणाचे व सर्वांगीण विकासाचे महत्त्व विशद करताना शिक्षकाला पार पाडावयाच्या विविध संवेदनशील भूमिकांची चर्चा केली. समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला. कार्यशाळेसाठी शिवाजी विद्यापीठ संलग्नित सांगली, गारगोटी, गडहिंग्लज, कोल्हापूर शहरातील अध्यापक महाविद्यालयातील शिक्षक प्रतिनिधी व विद्यार्थी सहभागी झाले होते.

सतीश कुंभार यांनी अध्यापनासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रतिकृती तयार करण्याचे प्रशिक्षण सहभागी विद्यार्थ्यांना दिले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. रूपाली संकपाळ, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, सर्व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

17 MAR 2026

पुढारी

# विद्यापीठात आज राहीबाई पोपरे यांचे विशेष व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी (दि. १७) सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत पद्माराजे स्मृती व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. 'देशी बियांचे संवर्धन आणि स्त्रियांची भूमिका' या विषयावर पद्मश्री राहीबाई पोपरे मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव असतील.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. त्याचदिवशी दुपारी २ ते ४.३० या वेळेत स्त्रियांसाठी शेतीपूरक व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा होणार आहे. निसर्गमित्र अनिल चौगुले मार्गदर्शन करणार आहेत. शारदाबाई पवार अध्यासन, पर्यावरणशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण सेंटर फार रूरल डेव्हलपमेंट, समाजशास्त्र अधिविभागाने आयोजन केले आहे.